# श्री. निळकंठ हरी सोनकुसरे

सेवक क्र. १२४० गरोबा मैदान, दिघोरीकर चौक, नागपूर

माझ्या पत्नीच्या हातापायांना झटके येत होते. डोके, छातीत व तळपायाला सुया टोचल्यासारखे वाटत होते. त्यामुळे रात्रभर झोप लागत नव्हती, याकरिता सर्वप्रकारचे उपचारही केले. पण त्यांचा फायदा झाला नाही. सुधाकर नंदनकर यांनी मला या मार्गाची रुपरेषा समजावून सांगितली. आम्ही हा मार्ग स्वीकारण्यास तयार झालो. हरिभाऊ कुंभारे यांच्या सुचनेप्रमाणे बाबांकडे गेलो पण बाबा गावी नसल्यामुळे आम्ही सुधाकररावांना तीर्थ करुन मागितले. त्यांनी बाबांच्या नावाने तीर्थ करुन दिले. त्याच रात्री तिला स्वस्थ झोप लागली. तिसऱ्या दिवशी तीर्थ करुन दिले नाही. त्यामुळे पत्नीची प्रकृती पुनःपूर्ववत झाली. नंतर गणेश नळवाले यांना घडलेली हकीगत सांगितली. त्यांनी सात दिवसांची साधी अगरबत्ती सांगितली. त्या दिवसापासून आम्हाला समाधान मिळाले. नंतर बेचाळीस दिवसांचे कार्य संपल्यानंतर केलेल्या हवनकार्याच्या प्रसंगी एक व्यक्ती दारु पिऊन उपस्थित होता. त्यामुळे पुन्हा रात्रभर हातपायांना झटके येणे सुरु झाले. त्यावर बाबांनी मार्गदर्शन करुन माफी मागण्यास सांगितले. त्याप्रमाणे कार्य केल्यानंतर पूर्ववत सुख समाधान मिळाले व झटके येणे बंद झाले.

* * * * *